| | |
|---|---|
| प्रकरण प्राप्त दिनांक | १२/१२/२०१९ |
| नोंदणीचा दिनांक | १२/१२/२०१९ |
| निकालाचा दिनांक | १८/०९/२०२४ |
| कालावधी | **व. म. दि. ०४/०९/०६** |

**निशाणी क्र. ११**

## अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, ०४ थे न्यायालय, गिरगांव, मुंबई यांचे न्यायालयात

**( पीठासीन अधिकारी : श. उ. देशमुख )**

**प्रकरण क्रमांक : ५५२/पी.डब्लू./२०१९**

| | |
|---|---|
| अ) प्रकरण क्रमांक | : ५५२/पी.डब्लू./२०१९. (सीएनआर क्र.एमएचएमएम१४–००४२४४–२०१९) |
| ब) गुन्हा घडल्याची तारीख | : दि.१०.०३.२०११ ते ०१.१२.२०१४ चे दरम्यान |
| क) फिर्यादीचे नांव | : महाराष्ट्र शासनातर्फे (ताडदेव पो. ठा.) गु. र. क्र. १०६/२०१८. |
| ड) आरोपीचे नाव व पत्ता | : जगदिश कृष्ण किसला<br>वय: ६१ वर्षे, धंदा: काही नाही,<br>रा. खोली क्र. बी/१०४, डॅफोडील नताशा पार्क, मिरा रोड पूर्व, ठाणे. |
| इ) गुन्हयाचे कलम | : भारतीय दंड विधान कलम ४०६ प्रमाणे. |
| फ) आरोपीची कबुली (असल्यास) | : आरोपीस गुन्हा अमान्य आहे. |
| ग) अंतिम निर्णय | : आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| ह) निर्णयाचा दिनांक | : १८/०९/२०२४. |

---

**अभियोगपक्षातर्फे स. स. अभियोक्ता दिप्ती भट**
**आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. महेश गुप्ता**

---

## न्यायनिर्णय

( जाहीर दिनांक १८/०९/२०२४ )

आरोपीविरूध्द भारतीय दंड विधान कलम ४०६ प्रमाणे आरोप ठेवण्यात आला आहे. त्यास आरोपी सामोरा जात आहे.

अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे असे आहे की,

२. तक्रारदार सन २००४ पासून इस्कॉन संस्थेच्या एन.जी.ओ. मध्ये व्यवस्थापक या पदावर कार्यरत आहेत. ते घटनेच्या वेळी सदर संस्थेच्या ताडदेव येथील कार्यालयात व्यवस्थापक या पदावर कार्यरत होते. सदर संस्थेचे काम शासकीय शाळांना शालेय पोषण आहार पुरविण्याचे आहे. सदर संस्थेने आरोपीचे कंपनीस कामगारांचे कॉन्ट्रॅक्ट दिले होते. सन २०१४ मध्ये कामगारांकडून त्यांचे भविष्य निर्वाह निधीबाबत तक्रार आली. म्हणून संस्थेने आरोपीकडे चौकशी केली. त्यावेळी आरोपीने कामगारांचे भविष्य निर्वाह निधी व विमा रक्कम रू.९,४६,३५४/— चा अपहार केल्याचे समजले. म्हणून तक्रारदाराने आरोपीविरूद्ध पोलीसात तक्रार दाखल केली.

३. सदर तक्रारीवरून पोलीस ठाणे अंमलदार यांनी गु. र. क्र. १०६/२०१८, भारतीय दंड विधान कलम ४०६ प्रमाणे गुन्हा नोंदविला. गुन्हयाचे तपासादरम्यान तपास अधिकाऱ्याने साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीस अटक केली. तपास पूर्ण झालेनंतर त्यांनी आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीविरूद्ध भारतीय दंड विधान कलम ४०६ अन्वये नि. क्र. २ प्रमाणे दोषारोप निश्चित केला. त्यातील मजकूर आरोपीस त्याचे मातृभाषेत वाचून समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबुल केला व प्रकरणाची संपरीक्षा करण्याची विनंती केली. आरोपीचे निवेदन फौ.प्र. सं. कलम ३१३ (१) (ब) अन्वये नोंदविले. त्यामध्ये त्याने असा बचाव घेतला

आहे की, त्याचेविरूद्ध खोटे प्रकरण दाखल केले आहे.

५. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात व त्यावरील माझे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत :—

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| (१) | आरोपीने दि.१०.०३.२०११ ते ०१.१२.२०१४ दरम्यान १९, जयवंत ईस्टेट, ताडदेव, मुंबई येथे तक्रारदार काम करीत असलेल्या इस्कॉन संस्थेच्या कामगारांचे भविष्य निर्वाह निधी व विम्याची एकूण रक्कम रू. ९,४६,३५४/— विश्वासाने दिली असता आरोपीने सदर रक्कमेचा स्वत:चे फायद्यासाठी अपहार केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय? | नाही. |
| (२) | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करिता :—**

६. उभय पक्षाचा युक्तिवाद ऐकला.

७. प्रकरण शाबीत करण्याकरिता अभियोगपक्षातर्फे तक्रारदाराचा पुरावा निशाणी क्र. ७ वर नोंदविलेला आहे. तक्रारदाराने पुराव्यात असे सांगितले आहे की, ते सन २००४ पासून इस्कॉन संस्थेच्या एन.जी.ओ. मध्ये व्यवस्थापक या पदावर कार्यरत आहेत. ते घटनेच्या वेळी सदर संस्थेच्या ताडदेव येथील कार्यालयात व्यवस्थापक या पदावर कार्यरत होते. सदर संस्थेचे काम शासकीय शाळांना शालेय पोषण आहार पुरविण्याचे आहे. सदर संस्थेने आरोपीचे कंपनीस कामगारांचे कॉन्ट्रॅक्ट दिले होते. सन २०१४ मध्ये कामगारांकडून त्यांचे भविष्य निर्वाह निधीबाबत तक्रार आली. म्हणून संस्थेने आरोपीकडे चौकशी केली असता आरोपीने कामगारांचे भविष्य निर्वाह निधी व

विमा रकमेचा अपहार केल्याचे समजले. म्हणून त्याने तक्रार (नि. क्र. ८) दाखल केली. तथापि आरोपीने तक्रार (नि. क्र. ८) मधील नमूद रक्कम संस्थेच्या अकाउंटला जमा केलेली असून सदर रक्कम संबंधित कामगारांना मिळालेली आहे. तसेच सदर संस्थेने आरोपीसोबतचे कामगारांचे कॉन्ट्रॅक्ट रद्द केलेले आहे. तक्रारदारास तक्रार (नि. क्र. ८) मधील मजकूर माहित नाही, या बाबी तक्रारदाराने उलटतपासात मान्य केल्या आहेत. त्यामुळे तक्रारदाराचा पुरावा अभियोगपक्षास उपयुक्त नाही.

८. अभिलेखावरील तक्रारदाराचे पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीने तक्रारदार काम करीत असलेल्या इस्कॉन संस्थेच्या कामगारांची भविष्य निर्वाह निधी व विम्याची एकूण रक्कम रू.९,४६,३५४/— चा स्वत:चे फायद्यासाठी अपहार केला, हे निर्विवादपणे शाबीत झालेले नसल्याचे दिसून येते. सबब मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>** :—

९. वरील विवेचन व मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष लक्षात घेता सबळ पुराव्याअभावी अभियोगपक्ष भा.द.वि. कलम ४०६ प्रमाणे आरोपीवरील अपराध सिद्ध करण्यास अपयशी ठरल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब मुद्दा क्र.२ च्या उत्तराकरीता मी खालील आदेश करीत आहे :—

## <u>आदेश</u>

(१) आरोपीस भारतीय दंड विधान कलम ४०६ अन्वये दंडनीय अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

(२) आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनबंधपत्र रद्द करण्यात येतात व त्यास मुक्त करण्यात येते.

(३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—अ प्रमाणे पुर्तता करावी.

(श. उ. देशमुख)
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
४थे न्यायालय, गिरगांव, मुंबई.

दिनांक: १८/०९/२०२४.

| | | |
|---|---|---|
| श्रुतलेखन दिनांक | : | १८/०९/२०२४. |
| श्रुतलेखन टंकलिखीत दिनांक | : | १८/०९/२०२४. |
| आदेश साक्षांकित दिनांक | : | १८/०९/२०२४. |